Vol 3 Issue 6 March 2014

Impact Factor : 2.1002 (UIF)

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

## Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

*Review Of Research*
Vol. 3 | Issue. 6 | March. 2014
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *भारताच्या प्रबोधन पर्वातील सृजनविचारसृष्टीचे प्रणेते महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याच्या ऐतिहासिक योगदानाची विश्लेषणात्मक समीक्षा*

*सुनीता सरायकर*

इतिहास विभाग प्रमुख
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर.

**सारांश :**

भारतात एकोणविसाव्या शतकाच्या पुर्वाधात सुरू झालेल्या वैचारिक क्रांतीमुळे मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवा आधुनिक दृष्टिकोन विकसित झाला. बुद्धिवाद, तर्कनिष्ठा, मानवतावाद या तत्त्वांनी आधुनिक दृष्टिकोनाला आकार दिला. या नव्या दृष्टिकोनातून काही समाजधुरिणांनी भारतीय प्रचलीत समाजव्यवस्थेचे, समाजाच्या सर्व पैलूंचे, जीवनपद्धतीचे तौलनिक दृष्ट्या परीक्षण करण्याचा प्रयत्न केला असता समाजातील काही गटांवर होणारा अन्याय, जुलूम, विषमता त्यांच्या दृष्टीस पडली. या अनिष्ट प्रवृत्ती व पद्धती नष्ट करण्याचा व समाज निरोगी बनविण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला.

## *प्रस्तावना :*

भारतात सुधारणाकार्याचा प्रारंभ धार्मिक क्षेत्रापासून झाला असला तरी धार्मिक सुधारणेचे अंतिम उद्दिष्ट सामाजिक उत्थानाचे होते. सामाजिक सुधारणेच्या कक्षेत धर्म हा विषय प्रामुख्याने येतो. लोकजीवनावर अत्यंत दृढपणे धर्माचा प्रभाव प्राचीन काळापासून पडलेला दिसून येतो. धर्म हा मानवीजीवनपद्धतीचा मूलाधार मानला जात होता. अनिष्ट रूढीरीतींचा उगम धर्मशास्त्रात आहे. व त्या धर्मसम्मत आहेत अशी समजूत त्याकाळी प्रचलित होती. या विचारांचे निर्मूलन करण्यासाठी धर्माचे मूलस्वरूप लोकांना समजावून सांगणे अगत्याचे होते. तसे धार्मिक क्षेत्रातील शब्द प्रामाण्य, कर्मकांडाचे स्तोम, अंधश्रद्धा, पुरोहित वर्गाकडून अज्ञानी समाजगटाचे होणारे शोषण, मूर्तीपूजा व अनेक देवदेवतांची उपासना, व्रतवैकल्ये हाच धर्म होय. असा अपसमज समाजावर प्रभाव ठेवून होता. हे सर्व नाहीसे झाल्याखेरीज समाजाचा विकास होणार नाही याची जाणीव सुधारकांना होती. त्याचबरोबर धर्माचा साधक बाधक विचार सामाजिक सुधारणेला आवश्यक असतो.

## *धर्मविषयक विचार :–*

जीवनाला धर्मविचारांचा बळकट पाया असावा असे मत सर्वच समाजसुधारकांनी मांडलेले आहे. धर्म जीवनाला उदात्ताची बेठक देतो, आत्मिक क्षमतेचा विकास साधतो हे लक्षात घेवूनच काही ज्ञाननिष्ठ सुधारकांनी धर्माची जागरूकपणे चिकित्सा केली. यातील एक चिकित्सक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होत.

धर्म हा परमार्थासाठी नसून तो ऐहिक जीवनाच्या सुखशांतीसाठी आहे. हा महत्त्वाचा विचार त्यांनी सांगितला. आधुनिक महाराष्ट्रीय समाजाची जडण–घडण विवेकवादावर आधारित असावी, मानव धर्मावर आधारित असावी असे त्यांना अभिप्रेत होते. महर्षी शिंदे यांच्यावर लहानपणी भागवत संप्रदायाचे वैचारिक संस्कार झालेत. सामाजिक विषमतेला छेद देणारा व श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा भावनेचा निषेध करणारा आणि निरर्थक कर्मकांड ताज्य मानून नैतिक पातळीवर सदाचरणाला महत्त्व देणारा असा हा धर्मपंथ होता. शिंदे यांच्या घरातील वातावरण जातिभेदाला थारा न देणारे, पुरोगामी

विचारांचे व उदारमतवादी असे होते. त्यामुळेच श्री शिंदे उदात्तधर्मविचारांवर आधारित असलेल्या प्रार्थनासमाजाचे ते खंदे पुरस्कर्ते बनलेत. विदेशात त्यांनी विविध धर्माचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे सर्व धर्मतत्त्वातील उदात्त तत्त्वाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. जीवनाच्या सर्व अंगाचा विचार हा भावनेच्या आधारावर समजून घेणे आवश्यक आहे अशी त्यांची विचारधारा होती. ईश्वराचे अस्तित्त्व त्यांनी स्वतःच्या प्रेरणेने व भावनेने समजवून घेतले. त्यांच्या मते ईश्वर हा कोणी शरीरविशिष्ट व्यक्ती नसून तो सर्वव्यापी शुद्ध चैतन्य आहे. ईश्वर म्हणजे गुणांचा आश्रय आहे. ईश्वर सुखस्वरूप आहे. दयेचा प्रेरक आहे. प्रेमाचा प्रवर्तक आहे. अशा सत्वप्रेरक ईश्वराचा आणि आपला संबंध जडतो कसा ? याचा शोध घेतांना शिंदे सांगतात की तो बुद्धीपेक्षा विश्वासाच्या द्वारे अधिक जडतो. बुद्धी आणि विश्वास याचे स्वरूप उलगडतांना शिंदे म्हणतात बुद्धी म्हणजे पुष्कळ प्रयत्नानंतर पुष्कळ सामग्रीच्या साहाय्याने अल्पज्ञान करून देणारी शक्ति तर विश्वास म्हणजे काहीच प्रयत्न न करता अल्पशा सामग्रीने पुष्कळसे ज्ञान प्राप्त करून देणारी शक्ति. मानवासाठी विश्वास अधिक मोलाचा आहे. जगात शुभाचा आणि मांगल्याचा प्रसार करणारी ईश्वर ही शक्ती भरली आहे. जगात सत्त्वाचा प्रवर्तक ईश्वर आहे. त्याची सदैव जाणीव ठेवूनच जीवन जगले पाहिजे. विश्वासामुळेच मानवाचे ईश्वराशी नाते जडते.

महर्षी शिंदे यांच्या मते आत्म्याचा विकास धर्माला अभिप्रेत आहे आणि आत्म्याचा विकास म्हणजे मीपणाचा अमर्याद विस्तार करणे होय. त्याला कुटुंबाची व राष्ट्राची सुद्धा मर्यादा असणे संकुचितपणाचे ठरते. प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या आध्यात्मिक क्षमतेवर त्यांचा विश्वास आहे. प्रत्येक व्यक्तीचा विकास झालाच पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे.

महर्षी शिंदे यांनी हिंदू धर्मात सांगितलेल्या चार पुरूषार्थाचा आपल्या भूमिकेतून अर्थ सांगितला. त्यांच्या मते खरे पुरूषार्थ दोनच आहेत. ते म्हणजे काम आणि धर्म. त्यांच्या मते काम म्हणजे इच्छा किंवा मनाची भूक आणि धर्माचा अर्थ कर्तव्य बुद्धी असा ते करतात. माणसाच्या ठिकाणी स्वाभाविकपणे दोन प्रवृत्ती दिसून येतात. इच्छा होणे ही एक प्रवृत्ती होय तर योग्य काय व अयोग्य काय यातील निवड कर्तव्यबुद्धीने करणे ही दुसरी प्रवृत्ती होय. कामना आणि कर्तव्यबुद्धी या दोन्ही भीन्न प्रवृत्ती असल्यातरी प्रत्येकीचा विकास परस्परावर अवलंबून आहे. कर्तव्यजागृतीच्या मुळाशी कामनेचा हव्यास असल्यामुळे जगाचे कल्याण झालेले आहे. कामना आणि कर्तव्यबुद्धी या दोन्ही पुरूषार्थाचे आचरण करता करता त्यामधील अलगपणा नाहीसा होवून त्यांची सांगड जुळते आणि त्यांच्यातील ऐक्य अनुभवास येते. हे ऐक्य पुर्णतेचे म्हणजेच मोक्षाचेच लक्षण होय. असे शिंदे यांनी प्रतिपादन केले आहे.

विश्वचैतन्याचा अनुभव येणे यालाच शिंदे ईश्वरी तत्वाचा अनुभव येणे साक्षात्कार होणे असे म्हणतात. जीवनात सारभूत असणारी वस्तू प्रेम ही आहे. या प्रेमावीण जीवन जीवनत्वास मुकते आणि मागे केवळ अस्तित्त्व ऊरते. एकत्वाची आणि अनंतत्त्वाची प्रचिती येणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने ईश्वरी साक्षात्कार होय. श्रद्धा आणि भावना यांच्या बळावर या प्रकारचा साक्षात्कार होतो. निसर्गाचे अतिभव्य, अतिसुंदर स्वरूप पाहिल्या नंतर किंवा एकांतामध्ये चिंतनावस्थेत असतांना अंतःकरणातील श्रद्धा अतिशय उत्कट झाल्यानंतर अशा प्रकारच्या साक्षात्काराचा अनुभव येवू शकतो अशी स्वतःची अनुभूती ते व्यक्त करतात. शिंदे यांच्या मतानुसार मानवी व्यवहारातील प्रत्येक कृती ही जागरूकपणे आणि प्रेमाने करणे म्हणजे धर्मसाधना होय. अशारीतीने विश्वास, प्रेम, श्रद्धा यांच्या उत्कट अविष्कारातून मांगल्याचा चैतन्याचा वर्षाव मानवी जीवनावर होत राहावा असे शिंदे यांना अभिप्रेत आहे असे दिसून येते.

आधुनिक महाराष्ट्रातील समाजाची जडण घडण विवेकवादावर आधारित असावी यावर कृतीशील चळवळ करणारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रात अग्रगण्य नेते होते. त्यांच्या सामाजिक कार्याची इमारत मानवधर्मावर आधारित होती. अस्पृश्यतेचा प्रश्न सामाजिक पातळीवरून मांडण्याच्या बाबतीत ते प्रारंभीचे विचारवंत ठरतात. माणसामाणसात भेद पाळणे हे अमंगल आहे अशा प्रकारचा वारकरी संप्रदायाचा संस्कार त्यांच्या मनावर बालपणीच झाला होता. शिंदे ब्रम्हधर्माचे अनुयायी होते. ब्राम्हधर्मात सर्व मानव ईश्वराची लेकरे आहेत त्यामुळे त्यांनी एकमेकांशी बंधुत्वाने वागावे असे सांगितले आहे. समाजात उपेक्षित राहिलेल्यांचा विकास घडवून आणला पाहिजे. त्यांच्यात स्वाभिमानाची व आत्मोन्नतीची जाणीव निर्माण व्हावी असे त्यांना वाटत होते. विचाराला कृतीचे जोरदार पाठबळ असल्याशिवाय सुधारणेचे पाऊल पुढे पडणार नाही. नुसती व्याख्याने देवून किंवा जाडे ग्रंथ लिहून त्यात विचार मांडून सुधारणा होते असे नाही तर प्रत्यक्ष विचारांप्रमाणे कृती हवी तरच सुधारणा घडून येते. उक्ती व कृतीमध्ये संगती व ऐक्य असावे असा त्यांचा सदैव प्रयत्न होता.

### *अस्पृश्यता निवारणः—*

त्यांच्या जीवनात अस्पृश्ता निवारणाच्या कार्याला अनन्यसाधारण महत्त्व होते. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी संस्थात्मक कार्याचा पाया त्यांनी घातला. यासाठी त्यांना अविश्रांत परिश्रम करावे लागलेत. अस्पृश्यता निवारण कार्याच्या पहिल्या पर्वाचे प्रणेते महर्षी शिंदे हे होते. या पर्वात अस्पृश्यांमध्ये स्वतःची अस्मिता जागृत व्हावी असे प्रयत्न शिंदे यांनी केले. अशा रितीने अस्पृश्यता निवारण्याची पुर्वपीठिका महर्षी शिंदे यांनी घडवली. त्यावेळी समाजावर सनातन विचारांचा पगडा भक्कम होता. बहुजन समाजाचे कल्याण आणि सुधारणा या समस्येकडे फारसे कुणाचे लक्षच नव्हते. शिंदे हे विश्वबंधुत्वाचे उपासक होते त्यांनी प्रमाण मानलेला धर्म हा विवेकनिष्ठ होता. यावर आधारित भारतीय समाजाची पुनर्घटणा व्हावी असे त्यांना वाटत होते. विचार आचरणात आणण्याचा सच्चेपणा त्यांच्यात होता. धडाडीने ते कृती करीत असत. विठ्ठल रामजी शिंदे महाविद्यालयात शिक्षण घेत असताना सुट्टीत घरी आले असतांना त्यांना एक अस्पृश्य

समाजातील मुलगी मुरळी म्हणून वाहिलेली आढळली. तिला चांगले जीवन जगता यावे यासाठी शिंदे यांनी तिला स्वतः घरी शिक्षण दिल. पुढे हीच मुलगी जमखिंडी येथील शाळेत शिक्षिकाबनली. अस्पृश्यांसाठी केलेले शिंदे यांचे हे पहिले कार्य होते येथूनच त्यांची अस्पृश्यता निवारण कार्याला सुरूवात झाली. 18 ऑक्टोबर 1906 रोजी त्यांनी भारतीय निराश्रीत साहाय्यकारी मंडळ ही संस्था स्थापन केली. ही संस्था अस्पृश्य लोकांच्या उन्नतीचे कार्य करणारी होती. इंग्लंडच्या वास्तव्यात त्यांना दीनदुबळ्यांची सेवा करणाऱ्या मिशनची ओळख झालेली होती. त्याच धर्तीवर समर्पणवृत्तीने आपण हे कार्य करावे असे त्यांना वाटले. बडोद्यात सयाजीराव गायकवाड तृतीय यांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाचे कार्य ज्या पद्धतीने करणे सुरू केले होते त्यामुळे शिंदे प्रभावित झालेत. ह्याच वेळी या वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य करण्याची गरज त्यांना तीव्रतेने जाणवली. अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांनी शाळा उघडल्या. उद्योगशाळा निर्माण केल्या. वसतीगृहे त्यांनी उघडली. त्याचबरोबर व्याख्याने, परिषदा, मिरवणुकी प्रदर्शने इ. माध्यमांच्या आधारे त्यांनी सामाजिक अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांना त्यांच्या कार्याविषयी विष्वास वाटावा यासाठी ते स्वतः त्यांच्या वस्तीत कुटुंबासह राहिले व त्यांच्याबरोबर त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी देखील असपृश्यांची सेवा केली.

### *शेतकरी वर्गाचे उत्थान :—*

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या दृष्टीने समाजातील पिडीत—शोषीतवर्ग म्हणून शेतकरी वर्गाच्या दारूण अवस्थेची जाणीव ठेवणे आवश्यक होते. युरोपमध्ये गेलेले असतांना त्यांनी इंग्लंड, फ्रांन्स, स्विर्त्झलंड या देशांमधील शेतकरी वर्गाचे जीवन जवळून अभ्यासले होते. त्यांच्या तुलनेत भारतीय शेतकरी जो सर्वांचा अन्नदाता आहे तोच कश्याप्रकारचे निकृष्ट जीवन जगत आहे याची त्यांना जाणीव झाली यातून त्यांचे लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नात गुंतले. 1926 ते 1932 या कालखंडात त्यांनी शासकांचे लक्ष शेतकऱ्यांकडे वेधण्याचा प्रयत्न केला.

अस्पृश्यांची शेतकी परिषद 1926 पुणे; मुंबई इलाखा शेतकरी परिषद 1928 पुणे; वाळवे तालुका शेतकरी परिषद 1931 बोरगाव; संस्थानी शेतकरी परिषद 1932 तेरदल; चांदवड तालुका शेतकरी परिषद 1932 वडणेर या पाच परिषदांमध्ये अण्णासाहेब शिंदे यांनी भाग घेवून शेतकऱ्यांमध्ये जागृती करून मोलाचे काम केले. अस्पृश्य हे दंडकारण्याचे मूळ मालक होत ही जाणीव पुणे येथील (1926) अस्पृश्य शेतकरी परिषदेत देवून सर्वांनी एकजुटीने जमिनीवरील गेलेली सत्ता मिळविली पाहिजे असे त्यांनी जाहिरपणे आव्हान केले. संस्थानी अंमलामुळे शेतकऱ्यांचे दुःख वाढले आहे. शेतकऱ्यांवर जास्त जुलूम अत्याचार होतो आहे. खेड्यात आणि कसब्यात मारवाडी—ब्राम्हण हे पांढरपेशा जातीतील लोक अडाणी शेतकऱ्यास सावकारी जाळ्यात गुंतवून मालक बनलेत त्यामुळे कसणारा शेतकरी मजूर बनला आहे. त्यांची स्थिती गुलामांसारखी आहे. जो शेतकरी निर्वाहाकरिता शहरात कामधंदा शोधण्यासाठी जात असे त्याची जमिन कालांतराने जमिनदारवर्ग हडपून घेत असे हे शिंदे यांनी अचूक हेरले व शेतकऱ्यांच्या हित संरक्षणासाठी जिल्हा व तालुका स्तरावर शेतकरी संघ स्थापण केले जावेत असे ठरविले. जो आपल्या कुटुंबियांचा पोषणाकरिता जमीन बाळगतो व तो स्वतः कसतो तोच खरा शेतकरी बाकीचे भांडवलदार सावकार होत अशी त्याची भूमिका होती. म्हणून या प्रतिस्पर्ध्यांना मात देण्याकरिता भूमिकामगार संघ स्थापण करून भांडवलदारांना रोखण्याचा त्यांनी प्रयत्न केला.अशा रितीने शास्त्रशुद्ध सत्याग्रही प्रतिकाराची उर्जा त्यांनी निर्माण केली. त्यांनी आपल्या नेतृत्वात संख्येने प्रचंड पण शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चे काढले. शेतकऱ्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव निर्माण करून दिली. शेतकऱ्यांच्या परिषदांमध्ये जे ठराव मांडले गेलेत त्यावर कार्यवाही होण्याच्या दृष्टीने यंत्रणा निर्माण करण्याचाही प्रयत्न शिंदे यांनी केला. शेतकऱ्यांनी संघटीत व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न केलेत. शेतकऱ्याने स्वतःचे आर्थिक स्वातंत्र्य मिळवावे व सामाजिक घडण करावी असे त्यांनी सांगितले.

### *स्त्रीविषयक विचार :—*

श्री शिंदे यांच्यावर त्यांचा आईच्या आत्मिक तेजाचा प्रभाव असल्यामुळे शिंदे यांचे स्त्रिविषयक विचार प्रगल्भ होते. धर्मकार्यात स्त्रिया अधिक प्रमाणात क्रियाशील झाल्या तर धर्मकार्य अधिक परिणामकारक रीतीने घडेल असे शिंदे यांचे मत होते. 1919 साली मुलांच्या बरोबरीने मुलींनाही सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी शिंदे यांनी चळवळ उभारली. विद्याबल, द्रव्यबल किंवा अधिकार नसल्यामुळे जो वर्ग मागासलेला राहिलेला आहे त्यातील एक स्त्रीवर्ग आहे. स्त्रियांच्या हिताची त्यांना कळकळ होती. 1925 साली शिंदे यांनी कौटुंबिक उपासना मंडळ सुरू केले. जेथे कुटुंबातील सर्व स्त्रिसदस्यांनी सदस्य होणे अनिवार्य होते. स्त्रीच्या स्वभावात असणाऱ्या सहनशीलतेमुळे कौटुंबिक व्यवस्था मजबूत बनते म्हणून 'स्त्रीदेवोभव' असे म्हटले पाहिजे असे शिंदे सांगत असत. मानवी विकासक्रमात स्त्रिचे योगदान महत्त्वाचे आहे असे शिंदे सांगत असत. म्हणून तीला खरेखुरे स्वातंत्र्य दिल्याने तिची विवेकबुद्धी आणि प्रयत्न शक्ती यांची वाढ होवून घरात आणि घराबाहेर ती प्रेमाचे साम्राज्य निर्माण करू शकेल. जे सामाजिक आरोग्यासाठी पोषक ठरेल. असे त्यांना वाटत होते. जमखंडी या संस्थानात शिंदे यांच्या वडिलांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करण्याचा प्रयत्न करून पाहिला होता पण तो यशस्वी झाला नाही, पण त्यांनी आपल्या मुलीला म्हणजे जनाक्का शिंदे यांना शिक्षण दिले. हाच वारसा शिंदे चालवू इच्छित होते. ''स्त्री वर्ग म्हणजे तर आमचा पाळणा! त्यांची हयगय करू तर पाळण्यातच आमचे थडगे डोलू लागेल हे आम्ही पूर्ण जाणून आहो,''असे महर्षी म्हणत असत. शिंदे यांना स्त्रियांच्या अंतरंगातील आध्यात्मिक

तेजाची जाणीव होती. शिंदे यांची स्त्रिविषयक दृष्टी अन्य विचारवंतापेक्षा वेगळी होती. त्यांनी आध्यात्मिक भुमिकेतून स्त्रिविषयक स्वतःची संवेदना व्यक्त केली. विवेकवादी भूमिकेतून स्त्रियांची स्थिती सुधारावी असे त्यांचे म्हणणे होते. त्यांचा हा विचार वेगळा व सखोल असा होता.

### *निष्कर्ष, समीक्षा :–*

अशा रीतीने विठ्ठल रामजी शिंदे यांचे विचार इतर सुधारकांपेक्षा वेगळे होते. नवे होते. कोणत्याही समस्येकडे आंतरिक दृष्टीने बघण्याची त्यांची संवेदनशीलता होती. बहुजन समाज जागृत व्हावा त्यांना स्वतःच्या पायावर उभे होण्याचे बळ यावे असे त्यांना कळकळीने वाटत असे. जीवनातील सर्व अंगाकडे उत्क्रांतीच्या किंवा विकासक्रमाच्या भूमिकेतून ते न्याहाळीत असत. शिंदे एखाद्या सामाजिक प्रश्नाचा विचार करीत असतांना ते त्या प्रश्नाचा ऐतिहासिक संदर्भ विचारात घेवून वर्तमान स्थितीचे आकलन करीत असत. मुल्यनिष्कर्षतेच्या कसोटीवर त्या प्रश्नाचे भविष्यकालीन स्वरूप कसे असावे याचे विश्लेषण करीत असत. त्यांच्या या गुणवैशिष्ट्यांमुळेच त्यांच्या सामाजिक स्वरूपाच्या विवेचनाला मौलिकता प्राप्त होत असे. अंतःकरणाचा जिव्हाळा, हेतूची शुद्धता व पवित्रता आणि अकृत्रिम प्रेम हा सर्व सुधारणांचा अटल पाया असतो. नुसत्या बुद्धिवादाने खऱ्याखुऱ्या सुधारणा घडत नसतात अशी त्यांची धारणा होती.

शिक्षणासंबंधी बोलतांना शिंदे म्हणत असत शिक्षणाचे काम मूलतः आईबापांचे आहे. श्रमविभागणीमुळे ते गुरू व गुरूपत्नी कडे गेले. एकत्र शिक्षण घेतांना बंधुत्वाची भावना निर्माण व्हावी व शाळा म्हणजे एक मोठे कुटुंब व्हावे व कुटुंबाप्रमाणे आत्मीयता सर्वांमध्ये वृद्धिंगत व्हावी हेच खरे शिक्षण असे शिंदे यांना अभिप्रेत होते. शिक्षकाने प्रेमभाव मनात रूजवून विद्यार्थ्यांवर शिक्षणाचे संस्कार करावे. शाळेतील शिक्षक अशाच प्रकारे निवडले पाहिजेत व प्रशिक्षित केले पाहिजेत की जे मुलांची मने समजून घेवू शकतील. यासाठी मुलांच्या घरी जावून त्यांच्या कुटुंबियांना भेटून, त्यांच्या समस्या जाणून त्यांचेशी वार्तालापकरू शकतील आणि विद्यार्थी घडवू शकतील. असा मुळातून विचार करणारे शिंदे हे एकमेव सुधारक होय. जातीभेद नष्ट व्हावेत. समाजात एकोपा नांदावा अशी त्यांची इच्छा होती. राष्ट्राची गरज काय आहे याचा विचार करून त्यांनी आपले ध्येय ठरविले व ध्येयसिद्धीचा आटोकाट प्रयत्न केला. पण तत्कालीन समाजाने त्यांच्या कार्याची व त्यागाची फारशी दखल घेतली नाही. हेच संवेदनशील व्यक्तीचे दुःख होय.

आधुनिक काळात म्हणजे आज 21 व्या शतकात मुल्यनिष्ठेचाऱ्हास झाल्यामुळे समाजात अनैतितकता फोफावली आहे असे दिसून येते. आजचा विद्यार्थी विचारांनी भरकटला आहे. त्यांच्या विचारांना योग्य वळण लावण्याची गरज आज संवेदनशील शिक्षणतज्ञ व्यक्त करतांना दिसतात. यातूनच मुल्याधारित शिक्षणप्रणाली राबविण्याचा विचार अंमलात येवू लागला आहे जो विचार महर्षी शिंदे यांनी वीसाव्या शतकाच्या पुर्वाधात मांडला होता याची जाणीव ठेवणे आज अगत्याचे वाटते.

त्याचप्रमाणे आजच्या आधुनिक शिक्षण प्रणालीत शिक्षकपालक म्हणजे ज्मबीमते डमदजवत अंतर्गत विद्यार्थ्यांच्या मनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला जात आहे हा विचार कितीतरी पुर्वीच विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्यक्त केला व अंमलात आणला.

वर्तमानकाळात शिक्षणाचा संबंध जीवनधारणेशी संबंधित असावा असे मत सामूहिकरीत्या व्यक्त होवू लागले आहे. त्यातनच शिक्षण आणि व्यवसाय ज्ञान यांची सांगड घातली जावू लागली आहे. जेणेकरून प्रशिक्षित विद्यार्थी घडवला जावू लागला आहे ज्याची समाजालाही गरज आहे हीच सृजनात्मक प्रक्रिया सामाजविकासाकरिता आवश्यक आहे असे महर्षी शिंदे यांनी आपल्या कार्यकाळात व्यक्त केले होते. शिंदे यांचा कार्यकाल 1873 ते 1944 हा होता. वयाची पहिली 20 वर्षे त्यांनी भारतातील शिक्षणात व्यतीत केली. 1893 ते 1903 या काळात त्यांनी विदेशात शिक्षण ग्रहण केले. 1903 नंतर त्यांनी खऱ्या अर्थी समाजोन्नतीचे कार्य केले. आता एकविसाव्या शतकात महर्षी शिंदे यांची आठवण का ठेवायची याचे उत्तर शोधू जाता असे म्हणता येईल की, ज्या विचारवंताच्या विचारात भविष्यकाळाकडे पाहण्याची दृष्टी असते समाज घडविण्याची क्षमता असते त्यांना प्रेरणा बनवून त्यांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत चालणे याचे भान समाजाने ठेवावे.

### *संदर्भ ग्रंथ*


| | | |
|---|---|---|
| 1. चव्हाण,रा.ना.<br>पाटील,डी.एल.(संपा.) | महर्षी विठ्ठलरामजी शिंदे<br>(काही आठवणी) महर्षी शिंदे | विद्यामंदीर वाई 1974 |
| 2. पवार गो. मा. | विठ्ठल रामजी शिंदे<br>जीवन व कार्य | नॅशनल बूक ट्रस्ट इंडिया<br>नवीदिल्ली 1990. |
| 3. पाटील एन. डी. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे<br>एक उपेक्षित महात्मा | प्रबोधन प्रकाशन ज्योती<br>कोल्हापूर 1999. |
| 4. पाटील पा. चि. | माझ्या आठवणी | मौज प्रकाशन गृह मुंबई<br>(1964) |

| | | |
|---|---|---|
| 5. फडके, य.दि. | विसाव्या शतकातील महाराष्ट्र 1901—1914 खंड 1. | सासवड आश्रम विश्वस्तमंडळ सासवड 1989. |
| 6. फडके, य. दि. | विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड 2 | श्रीविद्या प्रकाशन पुणे 1989. |
| 7. बाबर, रा.कृ | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | साकेत प्रकाशन औरंगाबाद 1991. |
| 8. वैद्य,द्वा.गो | प्रार्थना समाजाचा इतिहास | प्रार्थनासमाज मुंबई 1927 |
| 9. शिंदे वि. रामजी | धर्म, जीवन, तत्त्वज्ञान संपा. मा.प. मगुडकर | महाराष्ट्रशासन मुंबई 1979. |
| 10. शिंदे विठ्ठलरामजी | भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न संपा. मा. प. मंगुडकर | समाजकल्याण सांस्कृतिक कार्य,क्रीडा,पर्यटन मुंबई 1976. |
| 11. शिंदे विठ्ठल रामजी | माझ्या आठवणी व अनुभव भाग 1 | वत्सला प्रकाशन पुणे 1940. |
| 12. शिंदे विठ्ठल रामजी | माझ्या आठवणी व अनुभव भाग 1,2,3 | श्रीलेखन वाचन भांडार पुणे 1958. |
| 13. शिंदे विठ्ठल रामजी | शिंदे लेखसंग्रह संपा. मंगुडकर | ठोकळ प्रकाशन पुणे 1963. |
| 14. प्रा. ग. बा. सरदार | महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी | |
| 15. डॉ.निर्मलकुमार फडकुले | सामाजिक परिवर्तनाची चळवळ काल आणि आज | मुंबई विद्यापीठ मुंबई 1996. |





***सुनीता सरायकर***

इतिहास विभाग प्रमुख , वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

* DOAJ
* EBSCO
* Crossref DOI
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net